महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई-४००००१ दूरध्वनी क्र.०२२-२२६२०३०४
ई-मेल:director.msbac@gmail.com Website:www.msbac.org.in

क्रमांक : मराकशिमं-२०२४/आस्था/ 33 दिनांक : 02 JUL 2024

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व शासनमान्य कला संस्था,

विषय:- शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ (पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम)
सत्रारंभ व दिर्घसुटटया व सत्रसमाप्ती.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, शासकीय, अशासकीय अनुदानित कला संस्था, विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित कला संस्था यामध्ये शिकविल्या जाणा-या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे सत्रारंभ व दिर्घसुटटया व सत्रसमाप्ती याबाबतचे सविस्तर वेळापत्रक कला संस्थांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

कला संस्थांनी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रत:
१) मा. कला संचालक, कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२) उपसचिव (कला) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई/नागपूर/छत्रपती संभाजीनगर.
३) निवड नस्ती.

Scanned with OKEN Scanner

## शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ (पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम)

### सत्रारंभ, दीर्घसुट्टया व सत्रसमाप्ती.

सोमवार, दि.१० जून, २०२४ पासून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे पहिले सत्र सुरु होईल. या शैक्षणिक वर्षासाठी दीर्घसुट्टया, सत्रसमाप्ती आणि सत्राचे नियोजन खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

०१. १) आठवडयातून कमीत कमी एकूण ३० तास शिकविण्यात यावे. दररोज ६ तास याप्रमाणे संस्था प्रत्येक आठवडयात (महाविद्यालय) चालू ठेवण्यात यावी.

२) महिन्याच्या प्रत्येक शनिवारी व रविवारी महाविद्यालये बंद राहतील. तसेच महाविद्यालयांची कार्यालये महिन्याच्या पहिल्या, तिस-या व पाचव्या शनिवारी कामकाजाकरिता चालू राहतील.

३) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये शैक्षणिक कामाचे दिवस १८८ पेक्षा कमी भरणार नाहीत याची संबंधीत प्राचार्य यांनी खबरदारी घ्यावी

४) प्रथम सत्रात ९५ व द्वितीय सत्रात ९६ याप्रमाणे कामाचे दिवस गृहीत धरावेत. अशा त-हेने एका शैक्षणिक वर्षाचे कामाचे दिवस १९१ गृहित धरुन त्यापैकी ३ स्थानिक सुट्टया देता येतील व अशारीतीने १८८ दिवस अंतिमत: पूर्ण करणे आवश्यक राहील.

५) या शैक्षणिक वर्षात सत्रारंभ, दीर्घसुट्टया आणि सत्रसमाप्ती खालीलप्रमाणे राहील.

| शैक्षणिक सत्र व दीर्घसुट्टया | आरंभ दिवस | समाप्ती दिवस | एकूण कामाचे दिवस |
|---|---|---|---|
| प्रथम सत्र | सोमवार,दि.१० जून,२०२४ | ते शुक्रवार, दि.२६ ऑक्टोबर,२०२४ | ९५ |
| दिवाळी सुट्टी | सोमवार,दि.२८ ऑक्टोबर २०२४ | ते शुक्रवार,दि.०८ नोव्हेंबर २०२४ | |
| द्वितीय सत्र | मंगळवार, दि.११ नोव्हेंबर,२०२४ | ते गुरुवार, दि.३१ मार्च,२०२५ | ९६ |
| | | एकूण | १९१ |
| | | वजा स्थानिक सुट्टया | ३ |
| | | एकूण कामाचे दिवस | १८८ |

६) वरीलप्रमाणे दि.३१.३.२०२५ पर्यंत शैक्षणिक वर्षाचे द्वितीय सत्र,शैक्षणिक कामकाज पूर्ण करण्यात यावे. तथापि, दि.१ एप्रिल ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत महाविद्यालयाच्या अंतर्गत परीक्षेचे निकाल तयार करणे, शैक्षणिक वर्षाचे कामकाजाचे नियोजन करणे, उच्च कला परीक्षेचे कामकाज करणे, नवीन शैक्षणिक वर्षात शिकविण्यासाठी विषयाची पूर्वतयारी करण्याकरिता तसेच प्राचार्यांनी सोपविलेली इतर तद्नुषंगिक कामे करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी महाविद्यालयाचे कार्यालय चालू ठेवण्यात यावे. व दि.१ मे, २०२५ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करुन उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय असलेल्या कर्मचा-यांना उन्हाळी सुट्टी दि.२ मे, २०२५ पासून पुढे अनुज्ञेय राहील. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या सन २०२४ -२०२५ मधील सार्वजनिक सुट्टयांचा तक्ता व महिनानिहाय कामाचे दिवस असतील.

Scanned with OKEN Scanner

०२. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील १) प्रथम सत्र २) दिवाळी सुट्टी, ३) द्वितीय सत्र, ४) उन्हाळी सुट्टीचा कालावधी वरीलप्रमाणे राहील. या चार बाबींव्यतिरिक्त इतर बाबींचे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील नियमन पुढीलप्रमाणे करावे.

१) शासनाने जाहीर केलेल्या सर्व सार्वजनिक सुट्टयांचे दिवशी कला संस्था बंद ठेवण्यात यावीत.

२) याशिवाय उपरोक्त बंधन पाळून शासनमान्य कला संस्थांच्या प्रमुखांना दोन्ही सत्र मिळून एकूण ३ दिवसांची स्थानिक सुट्टी "कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांची आगाऊ मंजूरी मिळवून जाहीर करता येईल.

३) कला संस्थांतील अध्यापक वर्गाने सत्रारंभाच्या तारखेपासून संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. मात्र सत्रारंभापूर्वी शैक्षणिक स्वरुपाच्या प्राथमिक कामासाठी तसेच सत्रसमाप्ती नंतरच्या शैक्षणिक स्वरुपाच्या उर्वरित कामासाठी आवश्यकतेनुसार संस्था प्रमुख/प्राचार्य यांनी अध्यापक वर्गाला संस्थेत बोलाविल्यास त्यांनी उपस्थित रहावे.

४) विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थांच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क शासन निर्णय क्र.एडीआर-२०११/प्र.क्र.१५२/तांशि-६, दि.२७ फेब्रुवारी, २०१७ अन्वये घेणे आवश्यक असेल.

०३. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील विद्यार्थी प्रवेशासंबंधीची माहिती/कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

शासन पत्र क्र. एडीआर-२०२१/प्र.क्र.५७/तांशि-६, दि.१२.०८.२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित संस्थेतील मुलभूत, प्रथम वर्षाच्या अंतर्गत गृहसजावट, वस्त्रकाम, मातकाम, धातूकाम, कला शिक्षक प्रशिक्षण, रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला, आर्ट मास्टर (अंशकालीन/सुट्टीतील वर्ग), डिप.ए.एड. अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश देण्याची कार्यवाही सुरू आहे.

०४. कला शाखेतील द्वितीय (इंटरमिजिएट), तृतीय (ॲडव्हान्स) आणि पदविका (डिप्लोमा), आर्ट मास्टर (सुट्टीतील/अंशकालीन) अभ्यासक्रमासाठी विहित नियम:-

१) आपल्या संस्थेतून एलिमेंटरी व ॲडव्हान्स - रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध वर्गात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे इंटरमिजिएट व डिप्लोमाच्या वर्गात तसेच आर्ट ॲंड क्राफ्ट प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षात प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

२) आपल्या संस्थेमध्ये इंटरमिजिएट, ॲडव्हान्स व डिप्लोमा या वर्गात बदलीने प्रवेश घेण्यासाठी इतर कला संस्थेतील विद्यार्थ्यांकडून/संस्थांमार्फत काही अर्ज आले असल्यास विद्यार्थी पूर्वीच्या संस्थेत कोणत्या परिस्थितीत प्रवेश घेऊ शकत नाहीत याबाबतचे विद्यार्थ्यांचे लेखी निवेदनासह पूर्वीच्या कला संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला तसेच बदली प्रवेशासंबंधीची इतर आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन अशी बदली प्रकरणे संस्थेच्या स्तरावर निकाली काढावे. कोणत्याही परिस्थितीत याबाबतची बदली प्रकरणे कला संचालनालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत. संबंधित अभ्यासक्रमास बदलीने झालेल्या प्रवेशाची कार्यवाही प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीतच करण्यात यावी. प्रवेश प्रक्रीयाच्या अंतिम दिनांकानंतर कोणत्याही परिस्थितीत बदली प्रवेशासंबंधीची कार्यवाही करु नये. बदली प्रवेश हे प्रचलित प्रवेश

Scanned with OKEN Scanner

नियम व गुणवत्तेनुसारच देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत प्रचलित प्रवेश नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. अन्यथा उद्भवणा-या परिस्थितीस संबंधित संस्था/प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

विशेष सूचना:-

०५. १) शासकीय कला परीक्षेचे निकाल उशीरा जाहीर झाल्यास काही अभ्यासक्रमाचे वर्ग उशीरा सुरु होतील. त्यामुळे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी विहित केलेले एकूण कामाचे दिवस व अभ्यासक्रमास मिळणारे एकूण कामाचे दिवस यात पडणारी तूट संस्थांनी संबंधित वर्ग सुट्टीच्या दिवशी काम करुन भरुन काढणे आवश्यक आहे. तरोच कोणत्याही परिस्थितीत अभ्यासक्रमाचे एकूण कामाचे दिवस १८८ पेक्षा कमी भरणार नाहीत याची कला संस्थेच्या प्राचार्यांनी खबरदारी घ्यावी. वर्ग उशीरा सुरु केल्यानंतर मिळणारे एकूण प्रत्यक्ष कामाचे दिवस व विहित केलेले एकूण दिवस यात पडणारी तूट संस्था कशी भरुन काढणार आहे याबाबतची माहिती संबंधित वर्ग सुरु झाल्यानंतर एक महिन्याचे आत संबंधीत विभागीय कार्यालयाचे उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ यांना सादर करण्यात यावी.

तसेच फक्त बदली होऊन आलेल्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मुलांना/पाल्यांना प्रवेश मिळण्याबाबतची प्रकरणे खास बाब म्हणून प्रवेशास मान्यता मिळण्याकरिता सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई (निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांना परीपुर्ण प्रस्तावासह सादर करावीत. कला संस्थांनी अशी प्रकरणे स्वत:च्या अधिकारात निकाली काढू नयेत.

०६. नियमबाहय किंवा प्रवेश मर्यादेबाहेर विद्यार्थ्यांना प्रवेश दिले गेल्यास संबंधित संस्थेवर शासन निर्णय क्र.एनजीसी-२००५/(८२१/०५)मशि-३, दि.२२ जानेवारी, २००७ नुसार खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, अधिनियम २०२३ कलम २५(ख) नुसार अभ्यास पाठयक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने व शासनाने, वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक असणार नाही.

२) दंडाची रक्कम कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांकडून वसूल न करता कला संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

३) संस्थेने विद्यार्थी अथवा पालक यांच्याकडून कोणताही लाभ मिळण्याच्या दृष्टीने शर्त म्हणून रोख किंवा कोणत्याही स्वरुपात निधी स्विकारु नये. त्याचप्रमाणे या संबंधात कार्यालयाचे परिपत्रक क्र. पीआय-१०८९/दोन/५२६९, दि.१० मार्च १९८९ अन्वये कळविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे शिक्षण व सेवायोजन विभागाचे क्र.डिओअे-१०८८/(२१०००८) /साशि-५, दि. ५ मे, १९८८ च्या महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ नुसार कॅपिटेशन फी, देणग्या इत्यादी घेण्यास प्रतिबंध केला आहे. तसेच देणग्या घेण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कला संस्थांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

४) उपरोक्त बाबींचा विचार करता देणग्यांबाबत शासकीय आदेशाचे पालन काटेकोरपणे करण्याच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी कोणत्याही स्वरुपात संस्था देणग्या स्विकारत नाहीत हे सर्वांना कळावे म्हणून या कार्यालयाने पूर्वी सूचना दिल्याप्रमाणे कला संस्थेच्या दर्शनी भागात खालील मजकूराचा ठळक अक्षरात कायमस्वरुपी फलक त्वरित लावण्यात यावा.

"या कला संस्थेत विद्यार्थी अथवा पालकांकडून प्रवेशासाठी कोणत्याही स्वरुपात निधी स्विकारला जात नाही"

Scanned with OKEN Scanner

०७. विद्यार्थ्यांची वार्षिक हजेरी हि किमान ७५% भरणे आवश्यक आहे. विद्यार्थी महाविद्यालयात निष्काळजीपणाने हजर न राहिल्याने तो परीक्षेला बसण्यास अपात्र ठरतो.

०८. चालू वर्षाची (२०२४-२५) विद्यार्थी/विद्यार्थीनींची प्रवेशाबाबतची माहिती सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई (निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांना प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तात्काळ पाठविण्यात यावी.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात आपल्या कला महाविद्यालयात प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम वर्ष-मुलभूत अभ्यासक्रम, प्रथम वर्ष-कला शिक्षक प्रशिक्षण, प्रथम वर्ष-रेखाकला व रंगकला, प्रथम वर्ष-उपयोजित कला, प्रथम वर्ष-वस्त्रकला, प्रथम वर्ष-इंटेरिअर डेकोरेशन/आर्ट मास्टर प्रमाणपत्र, प्रथम वर्ष-सिरॅमिक्स व पॉटरी, प्रथम वर्ष-शिल्पकला व प्रतिमानबंध, डिप.ए.एड. इत्यादीचे मूळ प्रवेश अर्ज व प्रवेशासाठी सादर केलेली मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता व आपल्या कला संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी शिकत असलेल्या शाळा सोडल्याचा दाखला, शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, आर्ट मास्टर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाना प्रवेश घेतलेल्या शिक्षकांचे अनुभवाचे प्रमाणपत्र, सक्षम अधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र इत्यादी मूळ प्रमाणपत्रे घेऊन ऑगस्ट अखेर पर्यंत सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई (निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांचे सूचनेनुसार पडताळणी करुन घ्यावयाची आहे. अन्यथा सदर कला संस्थांमधून दिलेले प्रवेश रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित कला संस्थेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश प्रवेश तपासणीच्या वेळी समक्ष सादर करावेत. तसेच शासन परिपत्रक क्र.एडीआर-१४०५/(२१२/०५)/साशि-५, दि.१५ मे,२००६ अन्वये कला संस्थांचे वित्तीय स्थैर्य आश्वासित असणे या अटीची पूर्तता करणे सर्व संस्थांवर बंधनकारक आहे. वित्तीय स्थैर्याची अटीची पूर्तता केली किंवा कसे याबाबतची पडताळणी सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई (निरीक्षक, चित्रकला व शिल्प कार्यालय, मुंबई) यांचेकडून करण्यात येईल.

कला संचालनालयाने राबविलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयानुसार तसेच या वर्षी आपण दिलेल्या ऑनलाईन प्रवेशांची माहिती सादर केलेल्या मूळ कागदपत्रांची पडताळणी होऊन कला संचालनालयाने दिलेल्या प्रवेश मर्यादेच्या अधीन राहून ऑनलाईन प्रवेश दिलेले विद्यार्थीच परीक्षेस प्रविष्ट होण्यास पात्र असतील व परस्पर ऑफलाईन प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांस कोणत्याही परिस्थितीत परीक्षेस बसता येणार नाही, याची नोंद सर्व कला संस्थांनी घ्यावी व वर्ष अखेरीस त्यापैकी जे विद्यार्थी विहित हजेरी व वर्गकामाची पूर्तता करणार नाहीत त्यांची नांवे परीक्षेतून वगळण्यासाठी (Withdrawal) कळविण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांची राहील. निर्धारित तारखेस आपण आपल्या कला महाविद्यालयात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या, मूळ प्रवेश अर्ज व अर्जासोबतची मूळ प्रमाणपत्र सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई (निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांना सादर न केल्यास आपल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही असे गृहीत धरण्यात येईल, त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

०९. विद्यार्थ्यांच्या वर्गकामानिमित्ताने लागणारी असाईनमेंट कार्ड कला संस्थांनी छापून घ्यावयाची आहेत.

१०. तपासणी अधिका-यांच्या तीन आकस्मिक भेटीत विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आढळून आल्यास महाविद्यालय/अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शिफारस करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

११. संस्थांच्या आकस्मिक भेटीत तपासणी अधिका-यांनी विद्यार्थ्यांच्या वर्गकामाचा पोर्टफोलिओ मागितला असता पोर्टफोलिओ वर्गात नसल्याचे आढळून आले आहे.सदर पोर्टफोलिओ विद्यार्थी घरी घेऊन गेल्याचे सांगण्यात येते.तरी विद्यार्थ्यांचे वर्गकाम घरी घेऊन जाण्यास बंदी करावी व सर्व वर्गकाम वर्गात ठेवावे. विद्यार्थ्यांचे वार्षिक वर्गकाम ४०% भरणे आवश्यक आहे.

१२. संबंधीत कला संस्थांचे प्राचार्य यांनी परिपत्रकातील माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या तसेच अध्यापक वर्ग यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील महिनानिहाय शैक्षणिक कामाचे दिवस दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | महिना | दिवस |
|---|---|---|
| | प्रथम सत्र | |
| १ | जून,२०२४ (दि.१० ते ३० जून,२०२४) | १४ |
| २ | जुलै, २०२४ | २२ |
| ३ | ऑगस्ट, २०२४ | २१ |
| ४ | सप्टेंबर, २०२४ | २० |
| ५ | ऑक्टोबर, २०२४ | १८ |
| | एकूण-अ | ९५ |
| दि.२८ ऑक्टोबर, २०२४ ते ०८ नोंव्हेंबर,२०२४ पर्यंत दिवाळी सुट्टी | | |
| | द्वितीय सत्र | |
| ६ | नोव्हेंबर २०२४ (दि.११ नोव्हेंबर, २०२४) | १४ |
| ७ | डिसेंबर,२०२४ | २१ |
| ८ | जानेवारी,२०२५ | २३ |
| ९ | फेब्रुवारी,२०२५ | १८ |
| १० | मार्च,२०२५ | २० |
| | एकूण-ब | ९६ |
| | एकूण-अ+ब | १९१ |
| | वजा स्थानिक सुट्टया | ३ |
| | एकूण कामाचे दिवस | १८८ |

Scanned with OKEN Scanner